# प्रेरक कथा

वि. वि. पेंडसे



जून १९५० ते जानेवारी १९५१ या काळात
लेखकाने ‘साप्ताहिक काळ’साठी लिहिलेल्या
प्रेरक कथांचा हा संग्रह.

स्वामी विवेकानंदांच्या शिकागो येथील
भाषणाच्या दिवसाची कथा यात आहे.

चंद्रशेखर आझादांच्या बलिदानाची कथा आहे.

सुभाषबाबूंच्या आझाद हिंद सेनेच्या पराक्रमाची कथा आहे.

उनाड मानल्या गेलेल्या तरुणांच्या साहसाने
एका बाईचा जीव कसा वाचतो याची गोष्ट आहे.

तसेच लेखकाच्या आयुष्यातील
खरोखरी घडलेली एक गोष्टही यात आहे.

**कथासंग्रह**

**ज्ञान प्रबोधिनी प्रकाशन, पुणे**
**किंमत : ₹ १००/-**

ऑनलाइन खरेदीसाठी
jpprakashane.org

# प्रेरक कथा

लेखक
**वाचस्पती विनायक विश्वनाथ पेंडसे**

**ज्ञान प्रबोधिनी**
५१०, सदाशिव पेठ, पुणे - 411 030

**प्रेरक कथा – कथासंग्रह**


- **प्रकाशक व मुद्रक :** प्रा. महेन्द्र सेठिया
  कार्यवाह, ज्ञान प्रबोधिनी, पुणे – ४११०३०
  email - mahendra.sethiya@jnanaprabodhini.org


  © स्वामित्व प्रकाशकाच्या स्वाधीन


- **लेखक :** वाचस्पती विनायक विश्वनाथ पेंडसे
  संस्थापक, ज्ञान प्रबोधिनी


- **मुखपृष्ठ व आतील चित्रे :** गिरीश सहस्रबुद्धे
- **अक्षरजुळणी, सजावट व मांडणी**
  छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, पुणे
  chhatraprabodhan@jnanaprabodhini.org
- **आवृत्ती पहिली** : जानेवारी १९५१
- **आवृत्ती दुसरी** : मार्च १९६३
- **आवृत्ती तिसरी** : सौर भाद्रपद, शके १९३१ (ऑगस्ट २००९)
- **पुनर्मुद्रण** : सौर चैत्र, शके १९३५ (एप्रिल २०१३)
- **आवृत्ती चौथी** : सौर अग्रहायण, शके १९४३ (डिसेंबर २०२१)
- **पुनर्मुद्रण** : सौर वैशाख, शके १९४८ (एप्रिल २०२६)
- **ISBN : 978-93-49735-92-7**
- **किंमत :** ₹ १००/–
- **वितरण : छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ, पुणे – ३०**
  **☎ (०२०) २४२०७ १७५/१०८**
  **ऑनलाइन खरेदीसाठी:** www.jpprakashane.org


***'Prerak katha'***

**(Collection of Inspiring Stories)**

# लेखकाचे हृद्गत

*जून १९५० मध्ये 'दैनिक काळ'च्या संपादकीय विभागात काम करण्याचा योग आला. काम करू लागल्यापासून थोडक्याच दिवसांत 'काळ'चे कार्यकारी संपादक श्री. शंकरराव पाटणकर यांनी साप्ताहिक अंकासाठी कथा लिहिण्याबद्दल सांगितले. तेव्हापासून जानेवारी १९५१ पर्यंत ज्या कथा मी लिहिल्या, त्यांतील काही येथे संग्रहरूपाने एकत्रित प्रसिद्ध करण्यात येत आहेत.*


*अशा काही कथा आपण लिहाव्यात असा मनाचा संकल्प जरी जून १९५० पूर्वीच झालेला होता, तरी श्री. शंकरराव यांची प्रेरणा आणि उत्तेजन नसते तर तो प्रत्यक्षामध्ये उतरण्याची अल्पसुद्धा शक्यता नव्हती. श्री. शंकरराव यांनी गेल्या २४ वर्षांच्या काळात वेळोवेळी अशाच प्रकारचे जे साहाय्य केले त्याबद्दलचे त्यांचे ऋण खरोखरीच फिटण्यासारखे नाही.*

*घरच्याच कुटुंबीयांचे आभार मानण्याची पद्धत आपल्याकडे नाही. आभार मानू नयेत हे खरे; पण अशा स्वरूपाच्या ऋणाचा उल्लेखही न करणे हे कृतघ्नपणाचे ठरेल. मी जी जी गोष्ट मनात घेतली ती ती गोष्ट कै. ती. मातोश्री, दोघे वडील बंधू आणि चार वडील भगिनी या सर्वांनी उचलून धरली. या कथांच्या संग्रहाच्या पहिल्या आवृत्तीबाबत तोच प्रकार घडला म्हणून हे पुस्तक स्वत:च्या दायित्वावर प्रकाशित करता आले. या 'कथा' आहेत. हा काही 'इतिहास' नव्हे. यांतला प्रत्येक शब्दन् शब्द इतिहास संशोधकाच्या कसोटीला उतरेल असे नाही. तथापि हे निश्चयाने सांगता येईल की, घडलेल्या परिस्थितीचा विपर्यास कोठेही होऊ दिला गेलेला नाही.*

*पुस्तकात आलेल्या कथांच्या कथानकासंबंधी एवढेच सुचवावेसे वाटते की, या कथांची पहिली आवृत्ती सुमारे चार वर्षांपूर्वीच संपून गेली होती; पण विवेकानंद-कन्या निवेदिता यांचे चरित्र छापून प्रसिद्ध झाल्याखेरीज दुसरे काहीही प्रकाशन करायचे नाही, असे मीच माझ्यावर बंधन घालून घेतलेले असल्याने दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन लांबले. या आवृत्तीमध्ये विवेकानंदांची कथा शेवटच्या ऐवजी प्रथम घेतली आहे. एवढाच बदल केलेला आहे.*

**– वि. वि. पेंडसे**

वर्षप्रतिपदा १८८५
२६/३/१९६३



## वाचस्पती वि. वि. पेंडसे यांचा परिचय

* जन्म दि. १७ ऑगस्ट १९१६.
* पुणे येथील नूतन मराठी विद्यालय व सर परशुरामभाऊ महाविद्यालय येथे पदवीपर्यंतचे शिक्षण.
* १९३६ ते १९५८ या काळात राष्ट्रीय स्वयंसेवक संघात अनेक प्रकारे जबाबदाऱ्या घेऊन काम.
* १९४६ पंजाब व वायव्य सरहद्द प्रांताचा दौरा.
* १९५१ 'हरिसिंह नलुआ' चरित्र प्रकाशन.
* १९५१ 'विवेकानंद आणि इतर कथा' प्रकाशन.
* १९५२ 'राष्ट्रद्रष्टे विवेकानंद' प्रकाशन
* १९५२ 'विवेकानंद काय म्हणाले?' प्रकाशन.
* १९६१ मध्ये 'नेतृत्व विकसन' या विषयावर मानसशास्त्रातील विद्यावाचस्पती पदवी.
* १९६२ मध्ये ज्ञान प्रबोधिनीची स्थापना.
* १९६३ 'विवेकानंद-कन्या निवेदिता' चरित्र प्रकाशन.
* १९७२ मध्ये युरोप दौरा.
* १९७४ मध्ये संन्यासव्रताची चतुर्थ प्रतिज्ञा.
* डिसेंबर १९७५ मध्ये उपराष्ट्रपतींच्या हस्ते Excellence Award.
* सप्टेंबर १९७८ मध्ये पंतप्रधान मोरारजीभाई देसाई यांची प्रबोधिनीला भेट.
* १९८२ 'श्री माताजी श्री अरविंद काय म्हणाले?' प्रकाशन.
* जून १९८३ पंजाबात सद्भाव यात्रेसाठी युवक-युवतींना प्रेरणा.
* दि. १९ ऑगस्ट १९८३ महाप्रयाण.

# तिसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना

*ज्ञान प्रबोधिनीचे संस्थापक-संचालक कै. वि. वि. तथा आप्पा पेंडसे यांनी १९५०-५१ या वर्षांमध्ये दैनिक 'काळ'च्या साप्ताहिक पुरवणी अंकात लिहिलेल्या निवडक कथांचा संग्रह त्यांनी स्वत:च पुस्तक रूपाने प्रकाशित केला होता. त्यांतील काही कथा सर्वकाळ प्रेरक ठरतील अशा आहेत. काही कथांना तात्कालिक संदर्भ होता. अशा दोन कथा वगळता उर्वरित ५ कथा आजही तितक्याच प्रेरक आणि मार्गदर्शक आहेत. म्हणून 'विवेकानंद आणि इतर कथा' या पुस्तकाची तिसरी आवृत्ती 'प्रेरक कथा' या नावाने ज्ञान प्रबोधिनीतर्फे प्रकाशित करत आहोत. यांतील पाचही कथा अप्रसिद्ध नायकांच्या जीवनातील काही विशेष पैलूंवर प्रकाश टाकतात.*

**– गिरीश श्री. बापट**

## अनुक्रमणिका


| कथा | पान |
|---|---|
| १. हिंदू धर्माचे दिग्विजयी आचार्य विवेकानंद | ६ |
| २. क्रांतिकारकांचा सेनापती चंद्रशेखर आजाद | २९ |
| ३. स्वातंत्र्ययुद्धाच्या रणधुमाळीत मंदालेचा संग्राम | ४४ |
| ४. उनाड टप्पू? ...छे! सोन्यासारखी पोरे | ५५ |
| ५. सगा परिवर्तन | ६१ |